| CNR No.MHPU130023432025 | रे.दि.मु.नं. ४४८/२०२५<br>सोपान<br>वि.<br>साधू |
|---|---|

**निशाणी क्र. २८ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी दाव्यास कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, त्यांना मागच्या तारखेस ॲक्सेस व निशाणी क्र. १, ३ व ५ च्या प्रती मिळाल्या आहेत. तसेच त्यांना काही कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. त्यामुळे विहीत मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र. ३० येथे त्यांचे म्हणणे देऊन योग्य व कायदेशीर आदेश व्हावेत. असे कथन केले आहे.

४. प्रतिवादी क्र. २ व वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, त्यांना मागच्या तारखेस ॲक्सेस व निशाणी क्र. १ , ३ व ५ च्या प्रती मिळाल्या आहेत. तसेच त्यांना काही कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. त्यामुळे विहीत मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. सदर दाव्याचा गुणाणुगुणावर निपटारा होण्यासाठी दाव्यास कैफियत व म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ केल्याने मदतच होणार आहे. प्रतिवादी उशीराने दाव्यास कैफियत व म्हणणे देत असल्यामुळे वादींना होणा–या त्रासाची भरपाई काही रक्कम देवून करता येईल. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन न्यायाचे उद्दिष्टय साध्य करण्यासाठी खालील आदेश पारीत करत आहेः–

**आदेश**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र. २ यांनी दाव्यास कैफियत व म्हणणे देण्यास झालेला विलंब रक्कम रु.

५००/– इतकी भरपाई वादींना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

३. भरपाईची रक्कम दिल्यानंतर कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

RAVINDRA ANANDRAO SAWANT Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT Date: 2026.04.28 15:28:34 +0530

दिनांकः २८.०४.२०२६

सासवड.

**( रविंद्र आ. सावंत )**

२ रे सह दि.न्या. क. स्तर, सासवड.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 28/04/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 28/04/2026 |
| Order Uploaded on | : | 28/04/2026 |